ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २३ — पुणें, बुधवार तारीख १५ मे, १९५७ — अंक १०

## विविध माहिती

**हैद्राबाद येथें वर्कशॉप**—हैद्राबाद येथें हातमाग व त्याला लागणारे सुटे भाग तयार करण्यासाठी एक वर्कशॉप काढण्यास भारत सरकारनें मंजुरी दिली आहे. आंध्र राज्यांतील हातमागाच्या धंद्याच्या गरजा पुरविण्यासाठी तें स्थापन करण्यांत येत आहे. हें मध्यवर्ती वर्कशॉप स्थापन करण्यासाठी सरकारला ८,९०,००० रुपये खर्च करावे लागतील.

**पुरुषांनीं घरकामहि करावें**—भारत सरकारच्या उपमंत्री श्रीमती व्हायोलेट आल्वा ह्यांनीं भोपाळ येथें स्त्रियांच्या सभेंत बोलतांना पुरुषांना अशी सूचना केली कीं, त्यांनीं घरकामालाहि हातभार लावावा. त्या आणखी असेंहि म्हणाल्या कीं, पाश्चिमात्य देशांतील स्त्रीपुरुष सर्व क्षेत्रांत—घरांतसुद्धां—बरोबरीनें काम करतांना आढळून येतात.

**पन्ना येथील हिऱ्याच्या खाणी**—मध्यप्रदेश सरकारचे जंगलखात्याचे मंत्री श्री. शुक्ल ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींचें लवकरच राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल. खाणी चालविण्याचा परवाना खाजगी व्यक्तीला आतां पुन्हां देण्यांत येणार नाहीं. त्यांच्या मतानें ह्या खाणी अजून फार खोल खोदलेल्या नाहींत. जास्तींत जास्त ४० फूट खोल खोदण्यांत आलें आहे.

**जहागिरदारांना नुकसानभरपाई**—राजस्थानमधील जहागिरी खालसा करण्यांत आल्यामुळें राजस्थान सरकारनें जहागिरदारांना नुकसानभरपाई द्यावयाची आहे. चालू वर्षाच्या फेब्रुआरी अखेरपर्यंत सरकारनें ६,७६६ जहागिरी खालसा केल्या होत्या व त्यांचें उत्पन्न सालीना ४७ लाख रुपये होतें. जहागिरदारांना नुकसानभरपाई म्हणून २·५ कोटी रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**चीनमधील महागाई**—चीनच्या सरकारनें आंखलेला विकासाचा कार्यक्रम फार डोईजड असल्याच्या वार्ता येत आहेत. भांडवली स्वरूपाच्या खर्चात भलतीच वाढ करण्यांत आल्यामुळें ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू कमी पडत असून त्यांच्या किंमती वाढविण्यांत आल्या आहेत.

**कापूस संशोधन केंद्र**—विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सनें मुंबई राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना एक निवेदन सादर करून अकोला अगर अमरावती ह्या ठिकाणीं एक कापूस संशोधन केंद्र स्थापन करण्यांत यावें, अशी मागणी केली आहे. भारतामधील कापूस पिकविणाऱ्या प्रदेशांत विदर्भ हा एक महत्त्वाचा भाग मानला जातो.

**पोस्टल इन्शुरन्स पॉलिसी**—भारत सरकारनें एक पत्रक काढून १९३८ च्या विमाकायद्याचें ३९ वें कलम पोस्टातर्फे देण्यांत येणाऱ्या आयुर्विम्याच्या पॉलिसींना लागू केलें आहे. ह्या कलमाप्रमाणें विमेदाराला आपल्या पश्चात विम्याची रक्कम कोणाहि व्यक्तीस देण्यासाठी त्या व्यक्तीचें नांव नोंदवितां येईल. ह्यापूर्वी विमेदाराच्या वारसाला आपला कायदेशीर हक्क शाबीत करावा लागे.

**आंध्र सरकारचें ट्रेडिंग कॉर्पोरेशन**—आंध्र राज्यांतील खनिजांचा व्यापार चालविण्यासाठी राज्य सरकार आपलें ट्रेडिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा विचार करीत आहे. कॉर्पोरेशनचें संकल्पित भांडवल १० ते १५ लाख रुपयांपर्यंत असेल. ह्यासंबंधीं भारत सरकारची मंजुरी घ्यावी लागेल. कॉर्पोरेशनचे व्यवहार प्रथम अल्प प्रमाणावर करण्यांत येतील.

**बंद होणाऱ्या गिरण्या**—गुजरातमधील दोन कापडाच्या गिरण्यांच्या मालकांनीं गिरण्या बंद करण्यांत येणार असल्याच्या नोटिसा लावल्या आहेत. गिरण्या बंद करण्यास कोणती परिस्थिति कारण झाली त्याची चौकशी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या टेक्स्टाइल कमिशनरनें कांहीं तज्ज्ञांची नेमणूक केली आहे.

**पाकिस्तानांत भूदान सुरू करा**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं सुरू केलेली भूदानाची चळवळ पश्चिम पाकिस्तानांत चालू करण्यांत यावी अशी सूचना खान अब्दुल गफारखान ह्यांनीं केली आहे. अशा प्रकारच्या चळवळीला पाकिस्तानच्या सरकारनें पाठिंबा दिल्यास ती खूपच यशस्वी होईल, असें त्यांचें मत आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### १९२५ मधील कर्जासाठी बँकेचे आभार

डब्लिनचे लॉर्ड मेयर, रॉबर्ट ब्रिस्को, ह्यांनीं नुकतीच आपल्या अमेरिकेंतील दौऱ्याचे वेळीं, दि ट्रेड बँक अँड ट्रस्ट कंपनीच्या कचेरीला भेट देऊन, आयर्लंडचे पंतप्रधान इमॉन डी व्हॅलेरा ह्यांना बँकेनें १९२५ सालीं १५,००० डॉलर्सचें कर्ज दिलें होतें त्याबद्दल बँकेचे आभार मानले.

१९२५ मध्यें, आयरिश-अमेरिकनांच्या १५ च्या एका गटानें बँकेकडे डी व्हॅलेराच्या निवडणुकीसाठीं १५,००० डॉलर्स मिळण्याबाबत खटपट केली होती. ह्या १५ पैकीं प्रत्येकानें प्रत्येकी १,००० डॉलर्सची हमी घेतली होती. ह्या कर्जाची फेड थोड्याच अवधींत झाली; फक्त ६० दिवसांत कित्येक पाठ्यांनीं चर्चेसमधून पैसे गोळा करून बँकेकडे भरणा केला. त्या काळांत डी व्हॅलेराला मित्र मिळणें कठीण होतें; आणि पैसेवाला मित्र मिळणें तर त्याहून अधिक अवघड होतें. म्हणून तर ह्या कर्जाबद्दल इतकी कृतज्ञता. बँकेचा त्यावेळेचा चेअरमन, कार्ल इनेक, हा स्वतःच बोहिमियांतून आलेला निर्वासित असल्यानें, त्याला आर्थिक आपत्तींत सापडलेल्याबद्दल नेहमींच कळकळ वाटत असे.

---

### हिंदी चित्रपटांचा धंदा

१९५६ मध्यें एकूण २९४ देशी चित्रपटांना सेन्सॉर बोर्डानें मंजुरी दिली, त्याची वर्गवारी अशी:—

हिंदी १२१, बंगाली ५३, तामीळ ५०, तेलुगु २७, कानडी १४, मराठी १३, मल्याळी ५, गुजराती ३, ओरिया २, उर्दू २, आसामी ४.

तयार झालेल्या चित्रपटांपैकीं ४७% चित्रपट मुंबईंत, ३३% मद्रासमध्यें व २०% कलकत्त्यांत निर्माण झाले.

मुंबईंत मुख्यतः हिंदी, मद्रासमध्यें तामीळ आणि तेलुगु व कलकत्त्यांत बंगाली चित्रपट तयार करण्यांत आले.

१९५६ अखेर सुमारें १ लक्ष लोक ह्या व्यवसायांत होते व त्यांत ४२ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें होतें. सिनेमागृहांची संख्या ३,८२९ होती, त्यापैकीं ९९६ फिरते व तात्पुरते सिनेमा होते.

पाकिस्तान, इराक, मलाया, इंडोचायना, थाइलँड, ब्रह्मदेश, पूर्व आफ्रिका, येथें चित्रपटांची निर्गत झाली.

---

**अजंठ्याच्या लेण्यांचे डोंगर**—मराठवाड्यांतील अजंठा व वेरूळ येथील लेणी ज्या डोंगरांत खोदण्यांत आलीं आहेत ते डोंगर उजाड व वृक्षहीन आहेत. ह्या डोंगरावर रम्य वनश्री लावण्याची योजना मुंबई सरकारनें तयार करण्याचें ठरविलें आहे. त्या दृष्टीनें सध्यां ह्या भागाची तपासणी चालू आहे.

**विधानसभेंत वृत्तपत्राचें वाचन**—आंध्र विधानसभेंत प्रश्नोत्तराचें काम चालूं असतां विरोधी पक्षांतील एक सभासद एक दैनिक वाचत असल्याचें आढळून आलें. राज्य सरकारच्या मंत्र्यानें असें करतां येईल काय म्हणून सभापतींना विचारलें असतां त्यांनीं नकारार्थी उत्तर दिलें.

**तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री**—भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत आला आहे. कराराच्या अटींना अनुसरून भारत रशिआकडून तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री विकत घेणार आहे. रशिआनें साहित्य सहा महिन्यांत पुरवावयाचें असून त्याची किंमत म्हणून ३७-२४ लाख रुपये देण्यांत यावयाचे आहेत.

**मध्यप्रदेशांत सिमेंटचा कारखाना**—मध्यप्रदेशांत सटाणा ह्या ठिकाणीं सिमेंट तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं ४ कोटी रुपयांचें भांडवल लागेल व त्यांत दररोज ८०० टन सिमेंट तयार करण्यांत येईल. अशाच प्रकारचा आणखी एक कारखाना काढण्याची तयारीहि करण्यांत येत आहे.

**शारीरिक श्रम करण्याच्या सूचना**—चीनच्या कम्युनिस्ट पक्षानें सरकार व जनता ह्यांच्यांतील दुजाभाव नष्ट करण्याच्या हेतूनें सरकारी अधिकारी, बुद्धिजीवि वर्ग व लष्करी अधिकारी ह्यांना कामगार व शेतकरी ह्यांच्या बरोबर शारीरिक श्रम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कांहीं भागांत त्याप्रमाणें काम चालू आहे.

**बस व ट्रॅमच्या दरांची चौकशी**—कलकत्ता शहरांतील बस व ट्रॅम ह्या वाहनांच्या दरांची चौकशी करण्यासाठीं पश्चिम बंगाल सरकारनें तीन जणांचें एक कमिशन नेमलें आहे. देशांत नाण्यांची दशमान पद्धति सुरू झाल्यापासून ह्या दरांच्या श्रेणीवर काय परिणाम झाला आहे, त्याचीहि चौकशी कमिशननें करावयाची आहे.

**घरें बांधलीं, पण पाणी नाहीं**—कमी उत्पन्न असलेल्या लोकांसाठीं घरें बांधण्याची जी योजना आहे तिला अनुसरून म्हैसूर हौसिंग बोर्डानें चार महिन्यांपूर्वी ११६ नवीन घरें बांधलीं. पण त्यांपैकीं १०० घरांत अजून बिऱ्हाडें आलेलीं नाहींत. बंगलोर शहरांत पाण्याची टंचाई असल्यामुळें ह्या घरांची त्याबाबतींत सोय होऊं शकली नाहीं.


दि

## बँक ऑफ महाराष्ट्र लि.

-भांडवल-

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७,५०,००,००० चे वर |

ठेवी सुरक्षित ठेवून वाढविलेल्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर व्याज द. सा. द. शें. रु. २

—मुदतीच्या ठेवी—

| मुदत | दर |
|---|---|
| १ ते २ वर्षे | ३ टक्के |
| ३ वर्षे | ३। टक्के |
| ५ वर्षे | ३॥ टक्के |

रु. दहा हजारांवरील रकमांना तीन ते सहा महिने मुदतीसाठीं आकर्षक व्याज.

**व्यापारी उलाढालींच्या १४ केंद्रांत बँकेच्या शाखा असल्यामुळें महाराष्ट्र बँकेंत खातें उघडल्यानें आर्थिक व्यवहारांत विशेष सोय.**

हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली), नासिक, अहमदनगर, श्रीरामपूर, पनवेल व किर्लोस्करवाडी येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १५ मे, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पुस्तक प्रकाशनाचा धंदा

पुस्तक प्रकाशनाचा धंदा पुष्कळांना वाटतो, तितका किफायतशीर मुळींच नाहीं. ह्या धंद्यांत नुकसानच अधिक वेळां येतें, आणि तें भरून काढण्यासाठी युक्त्या-प्रयुक्त्या योजाव्या लागतात. ब्रिटिश पब्लिशर्स असोसिएशनला नऊ प्रमुख प्रकाशकांनीं आंकडेवार माहिती पुरविली, तिच्यावरून खालील निष्कर्ष निघाला :—

( १ ) पुस्तक विक्रेत्यांना सरासरीनें ३९·०७% कमिशन द्यावें लागलें.

( २ ) पुस्तक लेखकांना प्रकाशनाच्या हक्कासाठी सरासरी ११·८८% रॉयल्टी दिली.

( ३ ) उत्पादनाचा खर्च सरासरीनें २८·२४% आला.

( ४ ) जाहिरात व व्यवस्थाखर्च ह्यास सरासरीनें १७·२०% लागले.

( ५ ) सरासरी नफा फक्त ३·६१% उरला.

वरील आकड्यांवरून ग्रेटब्रिटनमधील पुस्तक प्रकाशनाच्या धंद्यावर उत्कृष्ट प्रकाश पडतो. अपेक्षेप्रमाणें पुस्तक विकलें गेलें नाहीं, म्हणजे फार मोठें नुकसान होतें, आणि हें कोणीच भरून देत नाहीं. सहाजीकच, अयशस्वी ग्रंथकारांना द्यावयाच्या मोबल्यावर परिणाम होतो आणि चांगल्या ग्रंथकारांनाहि कमी मोबदला पत्करावा लागतो. आयुर्विम्याचे व्यवसायांत, मेलेल्या विमेदारांच्या वारसांना द्याव्या लागणाऱ्या रकमेसाठी दीर्घायुषी विमेदारांना बोजा सहन करावा लागतो, तसाच कांहींसा हा प्रकार आहे. कारण, प्रकाशकाला धंदा चालू ठेवायचा असेल, तर त्याला नुकसान भरून काढण्यासाठी ग्रंथकारांच्या रॉयल्टीचे बाबतींत असेंच धोरण ठेवावें लागतें; बाकीचे खर्च लवचीक असत नाहींत. पुस्तकाची किंमत ही पुस्तकाचें स्वरूप, त्याची पृष्ठसंख्या, त्याच्या खपाचा अंदाज, इत्यादींवर अवलंबून ठेवावी लागते. किंमत फार ठेवली गेली, तर पुस्तकाचा खपच होणार नाहीं आणि ती फार कमी ठेवली तर ती किफायतशीर होणार नाहीं. "पुस्तक प्रकाशक होणें सोपें आहे, परंतु त्या व्यवसायांत टिकून रहाणें अवघड आहे. कोणत्याहि इतर व्यवसायापेक्षां ह्या व्यवसायांत बालमृत्यूंचें प्रमाण अधिक आहे" असें सर स्टॅन्ले अन्विन ह्यांनीं "दि ट्रुथ अबाउट पब्लिशिंग" ह्या आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे.

## कोऑपरेटिव्ह वेअरहौसिंग कॉर्पोरेशन

मुंबई राज्यासाठी एक कोऑपरेटिव्ह वेअर हौसिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरलें आहे. मध्यवर्ती सरकारचे शेतकी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख आणि मुंबई सरकारचे सहकार मंत्री श्री. भारदे ह्या उभयतांत वाटाघाटी होऊन वरील निर्णय घेण्यांत आला. संकल्पित कॉर्पोरेशनचें भांडवल १४ लाख रुपये असेल. त्यांपैकी निम्में भारत सरकार देईल व निम्में मुंबई सरकार देईल. कॉर्पोरेशनचें कामकाज पहाण्यासाठी १० डायरेक्टर्स नेमण्यांत येतील. त्यांपैकी पांच मध्यवर्ती सरकारचे व पांच मुंबई राज्य सरकारचे असतील. राज्यांत सुरवातीला ६० वेअरहौसेस उघडण्यांत येतील. नवीन इमारती बांधण्याची वाट न पहातां ह्या बाबतींत कामाला झपाट्यानें प्रारंभ करण्यांत येणार आहे. सध्यां असलेलीं वेअरहौसेस सरकार आपल्या ताब्यांत घेईल आणि जरूर तर कांहीं इमारती भाड्यानेंहि घेण्यांत येतील. मालाच्या साठ्याच्या इमारती शक्य तितक्या बाजारांच्या जवळ ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. वेअरहौसेस कशा प्रकारचीं असावीं तें ठरविण्यासाठी प्रमाणभूत असा एक नमुना तयार करण्यांत येईल. त्याचप्रमाणें वेअरहौसेसची व्यवस्था पहाण्यासाठी जरूर तो अधिकारी वर्ग मुद्दाम शिक्षण देऊन तयार करण्यांत येईल. वेअरहौसिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याची कल्पना रूरल क्रेडिट सर्व्हे इन्क्वायरी कमिटीनें केलेल्या शिफारसींना अनुसरून अमलांत आणण्यांत येत आहे. राज्य सरकारच्या वेअरहौसिंग केंद्रांव्यतिरिक्त मध्यवर्ती सरकारचें वेअरहौसिंग कॉर्पोरेशन राज्यांत पांच केंद्रें चालवील.

## मनःशांतीच्या शोधांत असलेली अमेरिका

अमेरिकेंतील लोकांना कशाचें अधिकांत अधिक वेड असेल तर तें उत्पादनाचें, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. धनोत्पादनाचें एक प्रकारचें वेडच त्यांना लागलेलें दिसतें. हें वेड सोडून दिलें तरी खऱ्या अर्थानें वेडे झालेल्या अगर होऊं घातलेल्या लोकांची संख्या येथें वाढत आहे असें दिसतें. अमेरिकेंत ॲस्पिरिन ह्या डोकेदुखीवरील औषधाचा खप इतर कोठल्याहि देशापेक्षा अधिक आहे. तेथील लोक झोपेच्या गोळ्यांचाहि फार वापर करतात असें म्हणतात. ह्या सर्व वार्तांवरून अमेरिकन लोकांची मनःशांति हरपलेली आहे, असा निष्कर्ष काढला तर तो फारसा चूक ठरणार नाहीं. कुबेरालाहि लाज वाटेल इतकी अमाप संपत्ति ज्या लोकांच्या पायाशीं लोळण घेत आहे त्यांची ही स्थिति पाहिली म्हणजे आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं. तथापि धनकनक संपन्न अशा ह्या देशांत वेड्या लोकांवर करण्यांत येणाऱ्या खर्चाची रक्कम अधिकच आश्चर्यजनक आहे. न्यूयॉर्क ह्या एकट्याच राज्यांत वेड्यांच्या इस्पितळांवर अगर तत्सम संस्थांवर १६० कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. ह्या शहरांत मानसिक रोग्यांवर उपचार करण्यासाठी एक नवें इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. ह्या एकाच संस्थेसाठी ३२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. ह्या अवाढव्य खर्चाकडे पाहिलें म्हणजे ज्यांच्या मनाचा तोल सुटला आहे अशांची संख्या वाढत असली पाहिजे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. ऐहिक सुखोपभोग हाच मानवी जीवनाचा अंतिम हेतु मानणाऱ्या ह्या वैभवशाली देशाला मनःशांतीचा शोध करावा लागावा ह्याचें रहस्य काय असेल ?

# Bhor State Bank

## Balance Sheet as

| CAPITAL & LIABILITIES | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| *Authorised Capital* | | |
| 10 000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000 0 0 |
| *Issued Capital* | | |
| 10,000 Shares of Rs. 50/-each ... | | 5,00,000 0 0 |
| *Subscribed Capital* | | |
| 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000 0 0 |
| Amount called up and Paid up at Rs. 25/- per Share ... | | 2,50,000 0 0 |
| **2. Reserve Fund & Other Reserves** | | 77,264 14 0 |
| Reserve Fund ... | 46,600 0 0 | |
| Investment Reserve Fund ... | Nil | |
| Investment Fluctuation Fund ... | 3,534 8 0 | |
| Reserve for Bad and Doubtful Debts ... | 27,130 6 0 | |
| **3. Deposits and Other Accounts :** | | 13,76,702 15 5 |
| Fixed Deposits ... | 4,91,333 5 6 | |
| Savings Bank Deposits ... | 5,90,558 11 6 | |
| Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 2,94,810 14 5 | |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | 14,510 9 10 |
| (i) In India ... | 14,510 9 10 | |
| (ii) Outside India ... | Nil | |
| *Particulars* | | |
| (i) Secured ( against Government Securities shown as per contra ... | 14,510 2 10 | |
| (ii) Unsecured ... | Nil | |
| **5. Bills Payable** ... | | Nil |
| **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra :...** | | 21,367 6 0 |
| (i) Payable in India ... | 21,367 6 0 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | |
| **7. Other Liabilities** | | 34,507 0 8 |
| (i) For Expenses ... | 420 10 0 | |
| (ii) Providend Fund partly invested as per contra ... | 14,185 14 4 | |
| (iii) Unpaid Dividends ... | 3,021 0 8 | |
| (iv) Branch Adjustments ... | 16,879 7 8 | |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra :** | | Nil |
| Carried Over... | | 17,74,352 13 11 |

# Limited, Bhor
## at 31st December, 1956

| PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | 1,33,773 9 5 |
| In hand and with The Reserve Bank of India and State Bank of India (Including Foreign Currency Notes) ... | | |
| **2. Balances with Other Banks (In current account)** | | 38,041 15 3 |
| (i) In India ... | 38,041 15 3 | |
| (ii) Outside India ... | Nil | |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | Nil |
| **4. Investments at cost** (Face value : Rs. 8,68,800 0 0 (Market value : Rs. 8,17,552 1 0 | | 8,72,155 6 0 |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 8,71,510 6 0 | |
| (Of these Securities of the face value of Rs.13,200 are earmarked for Provident Fund as per contra. Securities of the face value of Rs. 6,50,000/- are lodged with Banking Companies for overdraft arrangement). | | |
| (ii) Shares, Ordinary Shares fully paid up of the face value of Rs. 600/- (Market Price Rs. 616/-) ... | 645 0 0 | |
| (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| (iv) Other Investments ... | Nil | |
| (v) Gold ... | Nil | |
| **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | 6,48,807 4 2 |
| (1) Loans, Cash-Credits, Overdrafts, etc. | | |
| (i) In India ... | 6,26,807 4 2 | |
| (ii) Outside India ... | Nil | |
| (2) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| (i) Payable in India ... | 22,000 0 0 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | |
| **Particulars of Advances :** | | |
| (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 3,91,606 3 6 | |
| (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 1,93,261 3 8 | |
| (iii) Debts considered good and secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | Nil | |
| (iv) Debts considered doubtful or bad not provided for exclusive of Rs. 27,130-6-0 included in item No. (ii) fully provided for in the Reserve for Bad and Doubtful debts as per contra. | 63,939 13 0 | |
| | 6,48,807 4 2 | |
| (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | - Nil | |
| (vi) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or managing agents, or in the case of private companies, as members ... | 8,908 12 0 | |
| (vii) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or managers or officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | |
| (viii) Due from banking companies ... | Nil | |
| (ix) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking company are interested as directors, partners, or managing agents or, in the case of private companies, as members. ... | 9,916 4 0 | |
| Carried over ... | | 16,92,778 2 10 |

# Bhor State Bank

## Balance Sheet as

| CAPITAL & LIABILITIES | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| Brought Forward ... | | 17,74,352 13 11 |
| 9. Profit and Loss : | | 4,453 11 9 |
| Profit as per last Balance Sheet ... | 5,816 11 8 | |
| Less : appropriations :— ... | 5,692 14 0 | |
| Provision for Bad and doubtful debts. Nil | | |
| Reserve Fund 1,192 14 0 | | |
| Provision for Income-tax 4,500 0 0 | | |
| | 123 13 8 | |
| *Add* : Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss account ... | 4,329 14 1 | |
| 10. Contingent Liabilities ... | | Nil |
| Total ... | | 17,78,806 9 8 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended on 31-12-1956*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, Borrowings ... | | 29,901 0 0 |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund :— | | 22,603 1 8 |
| Manager and Chief Executive officers ... | 2,923 5 4 | |
| Others ... | 19,679 12 4 | |
| 3. Directors' and Local Committee Members' fees and allowances ... | | 2,843 0 0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 3,329 10 0 |
| 5. Law Charges ... | | 1,987 3 0 |
| 6. Postage, Telegrams, Stamps ... | | 930 4 6 |
| 7. Auditors' fees and Expenses ... | | 513 15 6 |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property ... | | 1,270 0 0 |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,071 10 6 |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | 0 0 0 |
| 11. Other expenditure : | | 1,739 6 6 |
| Sundry Charges ... | 730 11 3 | |
| Travelling & Conveyance ... | 761 2 3 | |
| Telephone charges ... | 247 9 0 | |
| 12. Balance of Profit (subject to taxation) carried to Balance Sheet ... | | 4,329 14 1 |
| Total ... | | 70,519 1 9 |

| INCOME | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (Less provision made during the year for Bad and Doubtful Debts and other useful or necessary provisions) | | |
| 1. Interest and Discount ... | | 65,129 6 3 |
| 2. Commission, Exchange, Brokerage ... | | 1,846 6 0 |
| 3. Rent ... | | 187 0 0 |
| 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account) ... | | 0 0 0 |
| 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or to any particular fund or account) ... | | 0 0 0 |
| 6. Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets ... | | 0 0 0 |
| 7. Other receipts : ... | | 3,356 5 6 |
| Shares Transfer fees and splitting fees ... | 18 12 0 | |
| Safe Custody charges ... | 854 0 0 | |
| Sundry receipts ... | 370 14 6 | |
| Supervision charges ... | 2,112 11 0 | |
| Total ... | | 70,519 1 9 |

# Limited, Bhor
## at 31st December 1956

| PROPERTY & ASSETS | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| Brought Forward ... | | 16,92,778 2 10 |
| 6. Bills Receivable, Being Bills For Collection As Per Contra : | | 21,367 6 0 |
| (i.) Payable in India ... | 21,367 6 0 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | |
| 7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra : ... | | Nil |
| 8. Premises Less Depreciation (at cost) | | 25,368 8 0 |
| As per last Balance Sheet ... | 26,399 15 9 | |
| Add : Additions during the year ... | 469 10 9 | |
| | 26,869 10 6 | |
| Less : Depreciation written off ... | 1,501 2 6 | |
| 9. Furniture & Fixtures (at cost) ... | | 10,154 3 3 |
| As per last Balance Sheet ... | 23,689 9 3 | |
| Add : Additions during the year ... | 0 0 0 | |
| | 23,689 9 3 | |
| Less : Depreciation ... | 13,535 6 0 | |
| 10. Other Assets Including Silver ... | | 29,138 5 7 |
| (i) Interest accrued but not received ... | 6,967 3 7 | |
| (ii) Stock of Printing & Stationary on hand (as valued and certified by the Manager) ... | 350 0 0 | |
| (iii) Interest due but not collected ... | 20 2 6 | |
| (iv) Sundry Debtors (Rs. 925-6-9 being considered doubtful and not provided for) ... | 7,794 3 6 | |
| (v) Stamp Account ... | Nil | |
| (vi) Income Tax paid at source ... | 14,006 12 0 | |
| 11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims ... | | Nil |
| 12. Profit and Loss Account ... | | Nil |
| Total ... | | 17,78,806 9 8 |

**Y. S. Joshi,** *Manager* — **M. V. Shingre,** *Chairman* — **N. P. Thopte,** *Vice Chairman*

**Y. D. Khole,** **B. G. Dhanduke,** **C. R Rathi** **G. B. Devi,** } *Directors*

**Report of the Auditors to the Shareholders.**

We have audited the annexed Balance Sheet of the Bhor State Bank Limited as at 31st December, 1956 and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated unaudited returns from all the Branches in India not visited by us for the purposes of this Report.

In accordance with the provisions of section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and 227 of the Companies Act, 1956 the Balance-Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act, 1956; they are therefore drawn up in conformity with forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank ; (c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank ; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns ; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1956 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona
28th February, 1957

Gadre & Bhide
Chartered Accountants.

### हातमागाच्या कापडाच्या निर्यातींत वाढ

भारतांत तयार होणाऱ्या हातमागाच्या कापडाच्या निर्यातींत वाढ होत आहे. १९५६ सालीं भारतानें निर्यात केलेल्या हातमागावरील कापडाच्या वारांत तर वाढ झालेली आहेच, पण परदेशी चलन मिळविण्याच्या दृष्टीनेंहि अशीच वाढ झालेली दिसून येते. गेल्या सालीं एकूण ५,९७,८६,००० वार कापड निर्यात करण्यांत आलें व त्यामुळें ८·६६ कोटी रुपयांचें परदेशी चलन मिळालें. १९५५ सालीं हेंच आंकडे अनुक्रमें ५,५८,२७,००० वार आणि ७·७७ कोटी रुपये असे होते. भारताकडून हातमागाचें कापड घेणाऱ्या प्रमुख देशांत पुढील देशांची गणना आहे. सीलोन नायजेरिआ, मलायाचें संघराज्य, एडन, सूडान, सिंगापूर, केनिआ, टँगानिका आणि कुवाइत. ह्यावरून भारताच्या पूर्वेस व पश्चिमेस नजीक असलेल्या देशांतून हातमागाच्या कापडाच्या निर्यातीस चांगला वाव असल्याचें दिसून येतें. अमेरिकेला भारतानें हातमागाचें कापड कांहीं प्रमाणांत निर्यात केलें आहे. पण ही निर्यात फारशी मोठी नाहीं. मात्र अमेरिकेला केल्या जाणाऱ्या निर्यातींत हळुहळु वाढ होत आहे. गेल्या वर्षाच्या अखेरीस अमेरिकेंतील तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत बोलावण्यांत आलें होतें. भारतामधील हातमागाचें कापड अमेरिकेस अधिक प्रमाणांत निर्यात होणें कितपत शक्य आहे आणि अमेरिकेंतील ग्राहकाला पटेल अशा प्रकारचें कापड भारतांत कसें निर्माण करतां येईल ह्या दोन प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठीं हे तज्ज्ञ भारतांत आले होते. त्यांनीं आपला अहवाल आतां भारत सरकारला सादर केला आहे. त्यांच्या मतानें चांगल्या दर्जाचें हातमागाचें कापड निर्माण करण्यांत आल्यास अमेरिकेंत बाजारपेठ मिळूं शकेल.

---

### बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी चळवळ

बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांतील कार्यकर्त्यांची परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेचें उद्घाटन बेळगांव येथील असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज श्री. प्रयाग ह्यांनीं केलें. परिषदेंत सहकाराशीं संबंधित असलेल्या अनेक विषयांची चर्चा करण्यांत आली. शेतीला लागणाऱ्या पैशाचा पुरवठा, सहकारी शेती, विहिरीपासून होणारा पाणीपुरवठा, बाजारपेठ मिळविण्यांचे सहकारी प्रयत्न, इत्यादि विषय चर्चेसाठीं घेण्यांत आले होते. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. प्रयाग म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी चळवळीचा प्रसार करण्यासाठीं कांहीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें कांहीं सूचना केलेल्या शिफारसी अमलांत आणणें आणि सहकारी चळवळीचीं उद्दिष्टें साध्य करणें ह्या दोन्ही गोष्टी यशस्वी रीतीनें करतां येतील. बेळगांव जिल्ह्यांत सध्यां निरनिराळ्या प्रकारच्या १,००० सहकारी संस्था आहेत. त्यांच्या सभासदांची संख्या १,३९,८३३ असून खेळतें भांडवल ४ कोटी, ६५ लाख, ४२ हजारावर आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत बेळगांव जिल्ह्यांतील सर्व खेडीं आणि शेती करणाऱ्या लोकांपैकी ६० टक्के लोक सहकारी चळवळींत समाविष्ट करण्याचा निश्चय केला पाहिजे. त्याचप्रमाणें शेतीविषयक प्राथमिक सहकारी संस्थांकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्जांत वाढ झाली पाहिजे. दोन कोटी रुपयांपर्यंत कर्जें देतां यावींत.

**तापाच्या साथीचा परिणाम**—सिंगापूरमध्यें आलेली दोषी तापाची साथ आतां मलायांत पसरली आहे. खाजगी व सार्वजनिक इस्पितळांतून प्रवेश मिळविण्यासाठी रोग्यांच्या रांगा लागल्या आहेत. कारखाने, दुकानें व व्यापारी संस्था ह्यांच्यामधील बराच नोकरवर्ग तापानें पछाडल्यामुळें कामावर गैरहजर राहिला आहे. त्यामुळें व्यापारउद्दीमाचें नुकसान झालें आहे.

**बिहार सरकारला कर्ज**—भारत सरकारनें बिहार राज्यसरकारला ४० लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. बिहारच्या ज्या भागांत दुष्काळ पडतो त्या भागांतील लोकांना रोजगार मिळेल अशा प्रकारच्या कायम स्वरूपाच्या विकास योजना हातीं घेण्यासाठी कर्जाचा विनियोग करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी राज्य सरकारला आतांपर्यंत २ कोटी रु. पेक्षा अधिक रकम देण्यांत आली आहे.

**सुएजचा कालवा तितकासा आवश्यक नाहीं**—ब्रिटनचे वाहतूक मंत्री मि. वॅटाकिन्सन ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असा विचार व्यक्त केला कीं, ब्रिटनच्या आर्थिक व्यवहारासाठीं सुएझचा कालवा वाटतो तितका आवश्यक नाहीं. तेलाचे नळ टाकणें, मोठीं तेल वाहतुकीचीं जहाजें बांधणें, इत्यादि मार्गांनीं ब्रिटन आपली व्यवस्था करूं शकेल.

**केरळमधील पाटबंधारा**—केरळच्या सरकारनें पाटबंधाऱ्याची एक योजना मध्यवर्ती सरकारकडे मंजुरीकरतां पाठविली होती. सदर योजनेला ३·४८ कोटी रुपये खर्च येणार आहे. मध्यवर्ती सरकारनें योजनेला मंजुरी दिली आहे.

**मध्यप्रदेशाच्या विणकरांना मदत**—मध्यप्रदेशांतील हातमाग विणकरांच्या धंद्याला मदत म्हणून भारत सरकारनें चालू वर्षासाठी १९,९६,००० रुपयांची रकम मंजूर केली आहे. नव्या मध्यप्रदेशांतील हातमागाच्या धंद्यानें चालू वर्षी ७ कोटी वार कापड तयार करावें, असें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे.

**मोटार सावकाश चालविणें, हा गुन्हा**—अमेरिकेंतील कनेक्टिकट ह्या उपराज्याच्या कायदेमंडळानें मोटार सावकाश चालविणें हें गुन्हा ठरविणारा कायदा केला आहे. रहदारीला अडथळा उत्पन्न होईल इतकी हळू मोटार गाडी चालविण्यास बंदी करण्यांत आली आहे. ह्या गुन्ह्याला किती शिक्षा देण्यांत येईल, तें मात्र स्पष्ट करण्यांत आलेलें नाहीं.

**छोट्यांत छोटी पाणबुडी**—अणुशक्तीच्या साह्यानें चालणारी लहानांत लहान पाणबुडी बांधण्याचे प्रयत्न अमेरिकेच्या आरमारातर्फे चालू आहेत. शत्रुपक्षाच्या पाणबुड्यांचा पत्ता लावण्याच्या कामासाठी त्यांचा उपयोग करून घेण्यांत येईल.

**प्रिन्स चार्लसचें टॉन्सिलसचें ऑपरेशन**—प्रिन्स चार्लस, ब्रिटिश गादीचा ८ वर्षे वयाचा वारस, ह्याच्या टॉन्सिल्स आणि ॲडिनॉइड्स काढण्याची शस्त्रक्रिया ९ मे रोजीं करण्यांत आली. टॉन्सिलायटिसमुळें त्याला तीन आठवडे शाळा बुडवावी लागली होती.

**लंडन-कलकत्ता बस बेपत्ता?**—२१ इंग्रज १७ एप्रिल रोजीं लंडनहून कलकत्ता येथें येण्यासाठी बसनें निघाले. तुर्कस्तानापर्यंत बसचा प्रवास सुरक्षित झाला. इराणच्या सरहद्दीवर त्या बसचा अद्याप पत्ता नाहीं. अंकारा व तास्रिझ ह्यांचेमधील ७०० मैलांचा प्रवास अत्यंत अवघड आहे आणि पुरांमुळें रस्ता वापरण्याच्या स्थितींत नाहीं. तेहेरान येथील ब्रिटिश वकिलातीची कचेरी बसचा व त्यांतील उतारूंचा कसून तपास करीत आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.